
| Publication | Tarun Bharat | | | | |
|---|---|---|---|---|---|
| Language | Marathi | Place | Nagpur | Date | 13/11/16 |

# अॅग्रोव्हिजनमध्ये कृषी उपयुक्ततेचे स्टॉल्स



प्रदर्शनातील शेतकऱ्यांची गर्दी

### प्रदर्शनीतील स्टॉल्स

- कृषी विज्ञान केंद्र, सेलसुरा, वर्धा
- व्हीएनआर नर्सरी
- युपीएल
- सहयोग मल्टी स्टेट क्रेडिट को-ऑप
- अमूल
- वारणा
- दिनशॉज्
- जी. एच. रायसोनी युनिव्हर्सिटी
- कृषी विज्ञान केंद्र, घातखेड, अमरावती
- जे. के. ट्रस्ट ग्राम विकास योजना
- कृषक भारती को- ऑप लि.
- राजकुमार अॅग्रो इंजिनीयर प्रा. लि.
- केंद्रीय कापूस संस्था, नागपूर
- सेंट्रल सिटरस रिसर्च इन्स्टिट्यूट

तभा वृत्तसेवा
नागपूर, १२ नोव्हेंबर

प्रत्येकाच्या आवडीचे आणि असणारे म्हणून मधास ओळखले जाते. हिंदू संस्कृतीमध्ये मधाला मोठे महत्त्व आहे. पूजेसाठी वापरल्या जाणाऱ्या पंचामृतात याचा वापर केला जातो. हे मध केवळ गोडच नाही, तर आरोग्यासाठी गुणकारी देखील आहे. आता हे मध शेतकऱ्यांच्या उत्पादनाचे साधन बनले आहे. शेतीला जोडधंदा म्हणून बरेच शेतकरी मधमाशी पालनाकडे वळले आहे. त्यांना मधमाशी पालनाचे आणि उत्पादन करण्याचे प्रशिक्षण मिळावे म्हणून प्रसारी हनी बी प्रा. लि. यांच्यामार्फत मार्गदर्शन करण्यात येत आहे. रेशीमबाग येथे आयोजित करण्यात आलेल्या आठव्या अॅग्रो व्हिजन कार्यशाळा, राष्ट्रीय कृषी प्रदर्शन व परिसंवादात प्रसारी हनी बी, पुणे या कंपनीसह शेतकरी हिताचे अनेक स्टॉल्स लावण्यात आले आहे. त्यांच्या माध्यमातून स्टॉलवर येणाऱ्या शेतकऱ्यांना मधमाशी पालन आणि मधाच्या उत्पादनाविषयी माहिती देण्यात येत आहे. मधात पळसाचे मध, सुबाभळीचे, कुकुम्बुर, आंबा व मोहफुलांपासून बनलेले मध, जंगलातील तुरीपासून बनविलेले मध, मल्टीफ्लोरा मध यांच्यासह एकूण १९ प्रकार आहेत. मधमाशी जमा करीत असलेल्या बाजरी आणि मोहरीच्या परागकणामुळे ४३ प्रकारचे रोग बरे होतात. सुबाभळीच्या मधाचे सेवन केल्यास हाडाची ठिसूळता तर पळसाच्या मधामुळे स्त्रियांच्या समस्या दूर होतात. एपीस मेरीफेरा या माशीने जमा केलेल्या प्रोपोलिस या मधाचा वापर कर्करोगाच्या औषधांमध्ये करण्यात येतो. मधाचे विविध औषधी गुणधर्म देखील ते समजावून या प्रसारी हनी बी स्टॉलवर सांगितले जात आहे.



वॉटर टेस्टिंग आणि सॉईल टेस्टिंग कीट



७०० ग्रॅमचा पेरू

तसेच, नारळ देखील अतिशय गुणकारी आहे. याची माहिती भारत सरकारच्या नारळ विकास बोर्डाच्या स्टॉलवर देण्यात येत आहे. नाराळापासून पाणी, तेल किंवा किसच मिळत नाही, तर त्यापासून मध, व्हिनेगर, सिरप, साखर, हेअर क्रिम, माऊथ फ्रिशनर देखील बनविल्या जातो. या बोर्डाचे मुख्यालय कोची

प्रकल्पाचा देखील या ठिकाणी स्टॉल आहे. या ठिकाणी विशेष केंद्रीय सहाय्य योजना, पं. दीनदयाल उपाध्याय स्वयंयोजना, पारधी समाजाच्या लाभार्थ्यांना घरकुल बांधून देणे, आदिम जमातीचे संरक्षण आणि विकासयोजना, शबरी आदिवासी घरकुल योजना, आदिवासी शेतकऱ्यांना वीजपंप आणि तेलपंप पुरविणे याबाबतची माहिती पुरविण्यात येत आहे. राम अॅग्रो येथील कॅन्सर, हृदयघात, डेंग्यू आणि मलेरिया यावर गुणकारी ठरणारे ड्रॅगनफ्रूट आकर्षणाचे केंद्र ठरत आहे.

अॅग्रो व्हिजन शेतकऱ्यांचा सर्वांगिण विकास व्हावा या दृष्टीने आयोजित करण्यात येते. दरवर्षीप्रमाणे यावर्षी देखील शेतकऱ्यांसाठी स्टॉल्स लावण्यात आले आहे.



एनएमके १ सीताफळ

### एका डोममध्ये ७७ स्टॉल्स

अॅग्रो व्हिजनमध्ये ए, बी, सी, डी, ई, एफ, जी असे सात डोम तयार करण्यात आले असून, प्रत्येक डोममध्ये एकूण ७७ स्टॉल्स आहे. तसेच कार्यशाळांसाठी देखील वेगळे डोम तयार करण्यात आले आहे. प्रत्येकाला सोयीचे होईल. अशी जागा देखील दोन स्टॉल्सदरम्यान ठेवण्यात आली आहे.



### घरीच पाणी तपासण्याची सोय

प्लास्टी सर्ज इंडस्ट्रिज् प्रा. लि. या कंपनीतर्फे शेतकऱ्यांसाठी खत तपासणी मशीन तयार करण्यात आली आहे. तसेच दैनंदिन वापरातील पाण्याची स्वच्छता तपासण्यासाठी देखील मशीन तयार करण्यात आली आहे. ट्युबमध्ये दिलेल्या संकेतानुसार पाणी घेऊन त्यात केमिकलचे ड्रॉप्स टाकावे. यामुळे पाण्याचा रंग बदलेल. रंगानुसार पाणी किती स्वच्छ आणि अस्वच्छ आहे, ते कळण्यास मदत होईल.

### ७०० ग्रॅमचा पेरू आणि लाल सीताफळ

अॅग्रो व्हिजनमध्ये शेतकऱ्यांनीच प्रयोग करून ७०० ग्रॅमचा पेरू आणि लाल सीताफळाचे उत्पादन घेतले आहे. पेरूचे झाड ५ ते ६ फुटाचे तर सीताफळाचे झाड दहा फुटाचे. एका झाडाला ५० ते ६० याप्रमाणे फळे लागतात. प्रयोग करून तयार केलेल्या